**प्रेसनोट दिनांक ०३/०३/२०१९**

**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर**

**विमानतळ पोलीस स्टेशन येथील पोलीसांनी मटक्याचे अवैध धंदयावर छापा टाकुन चार लोकांना ताब्यात घेवुन उत्कृष्ठ कामगिरी केले बाबत...**

दिनांक ०१/०३/२०१९ रोजी सहा.पोलीस निरीक्षक श्री खोकले, पोलीस नाईक १९५१ संकपाळ, पोलीस शिपाई ७५९३ धावडे, पोलीस शिपाई ७५५० भोसले पोलीस निरीक्षक गुन्हे श्री बळवंत मांडगे विमानतळ पोलीस स्टेशन पुणे व मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र पाटील विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर यांचे दिमतीत विमानतळ पोलीस स्टेशन हद्दीत अवैधपणे चालणाया धंद्या संदर्भाने नगर रोडने पेट्रोलिंग करीत असताना पोलीस नाईक १९५१ संकपाळ यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, उपाला हॉटेल समोर नगर रोड फोर पॉईन्ट हॉटेल शेजारी मोकळया जागेमध्ये विमाननगर पुणे येथे ०१ इसम मटक्याच्या चिठठया देवुन लोकांकडुन पैसे घेत आहेत,अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सहा पोलीस निरीक्षक खोकले यांनी रस्त्याने जाणाया दोन इसमांना पंच म्हणुन बोलावुन घेवुन बातमीचा आशय त्यांना थोडक्यात समजावुन पंचांनी संमती दिल्याने त्यांनी सदर ठिकाणी २०/१५ वाजता छापा कारवाई करुन तेथे मटका जुगार घेणारा इसम नामे १.विलास दगडु पाटोळे वय ४४ वर्षे धंदा मजुरी रा. खुळेवाडी, दुर्गामाता मदीरा समोर, चंदननगर पुणे. मटका जुगार खेळणारे १.दयानंद शिवाजी सावंत वय ४४ वर्षे धंदा भाजी विक्री रा. यमुनानगर झोपडपट्टी विमाननगर पुणे. रमेश पुन्या राठोड वय २९ वर्षे धंदा बिगारी काम रा. बर्मासेल इंदीरानगर झोपडपट्टी विमाननगर पुणे ३.वासुदेव निवृत्ती देवकर वय ६० वर्षे धंदा शेती रा. फलॅट नं. ४०१ ,टॉवर – २, ब्रम्हा सनसिटी वडगांव शेरी पुणे यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन किंमत रुपये ४८५/- रु. किं.चे मटक्याचे साहीत्य व रोख रक्कम ताब्यात घेवुन विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा रजि नंबर १०६ /२०१९ महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेले असुन वरील नमुद अधिकारी व पोलीस कर्मचारी यांनी उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे. दाखल गुन्हयाचा तपास सहा पोलीस निरीक्षक श्री खोकले विमानतळ पोलीस स्टेशन पुणे हे करीत आहेत.

**(बळवंत मांडगे)**
**पोलीस निरीक्षक,(गुन्हे)**
**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर**